# पोलिस स्मृतीदिनी हुतात्म्यांना आदरांजली

प्रतिनिधी । अकोला

देशातील एकुण २९२ हुतात्मा शुर पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सोमवारी २१ ऑक्टोबरला येथील पोलिस मुख्यालयात पोलिस स्मृतीदिनानिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

जिल्हा पोलिस अधीक्षक अमोघ गावकर यांनी सकाळी साडेसात वाजता हुतात्मा पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मानवंदना दिली. या कार्यक्रमास पोलिस अधीक्षक अमोघ गावकर, अपर पोलिस अधीक्षक विक्रांत देशमुख, शहर पोलिस उपअधीक्षक सचिन कदम व इतर पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची प्रस्तावना पोलिस निरीक्षक देवराव खंडेराव यांनी करून सर्व हुतात्मा पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नावांचे वाचन केले व कार्यक्रमांच्या परेडचे संचालन राखीव पोलिस निरीक्षक श्रीधर गुलसुंदरे यांनी केले, अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आली आहे.



येथील पोलिस मुख्यालयात पोलिस स्मृतीदिनानिमित्त सोमवारी शहिद पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी